Purushottam Khaparde Health & Education Society's
Yashoda Girls'
Arts & Commerce College, Nagpur
• Recognized by Government of Maharashtra • Affiliated to RTM Nagpur University, Nagpur
Re-accredited by NAAC 'B++' Grade (Second Cycle March - 2023)
• Tel. : 0712 - 2290368 • Email : ygc.ngp@rediffmail.com
Sneh Nagar, Wardha Road, Nagpur 440015

------------ NATIONAL SERVICE SCHEME ----------

Dr. Lalita Punnya 9850348812

# ANNUAL REPORT

## 2025 -2026


| SR. NO. | TITLE | DATE |
|---|---|---|
| 1. | International Yoga Day | 21/06/2025 |
| 2. | Cyber Crime Awareness Program | 5/08/2025 |
| 3. | Tree Plantation | 09/08/2025 |
| 4. | International Youth Day | 12/08/2025 |
| 5. | Anti Ragging Week | 12/08/2025 to 18/08/2025 |
| 6. | Har Ghar Thiranga Rally | 14/08/2025 |
| 7. | Cleanliness Drive | 14/08/2025 |
| 8. | Independence Day | 15/08/2025 |
| 9. | Rajiv Gandhi Jayanti (Sadbhawana Din) | 20/08/2025 |
| 10. | Ozon Day | 16/09/2025 |
| 11. | Road Safety Awareness Program | 17/09/2025 |
| 12 | NSS Day Week Program | 22/09/2025 to 29/09/2025 |
| 13. | Operation Thuder Program | 19/11/2025 |
| 14. | Savidhan Din | 26/11/2025 |
| 15. | Visti to Book Fair | 28/11/2025 |
| 16. | HIV Aids Day | 2/12/2025 |
| 17. | National Youth Day | 12/01/2026 |
| 18. | NSS Camp | 18/01/2026 to 24/01/2026 |

| SR.NO. | DATE & ACTIVITY | REPORT |
|---|---|---|
| १. | **शनिवार दिनांक २१/०६/२०२५**<br>**आंतरराष्ट्रीय योग दिन**<br><br><br><br> | **आंतरराष्ट्रीय योग दिन -** शारिरीक शिक्षण विभाग व् राष्ट्रीय सेवा योजना विभाग तर्फे आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला. याप्रसंगी श्रीमती मंदाताई पाटील व श्री पंढरी चींचोलकर योगतज्ञ सहजयोग ध्यान साधना केंद्र, नागपूर यांना आमत्रित करण्यात आले. त्यांनी शारीरिक व मानसिक आरोग्य व्यवस्थित राहण्याकरिता योग हा सर्वोत्तम उपाय आहे, ध्यानात्म्क आसन, शरीर संवर्धनात्म्क आसन, विश्रांतिकारक आसन, ओंकार, प्राणायाम याविषयी माहिती दिली. महाविद्यालायचे प्राचार्य डॉ. शरद सांबारे यांनी यांनी योग, प्राणायाम यांना आपल्या जीवनशैलीत सामील करा असे मत व्यक्त केले. |
| २. | **मंगळवार दिनांक ०५/०८/२०२५**<br>**सायबर सेक्युरीटी जनजागृती**<br><br><br><br>यशोदा महाविद्यालयात 'सायबर सुरक्षा जनजागृती'<br>नागपूर : यशोदा गर्ल्स आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, नागपूर येथे शारीरिक शिक्षण व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. क्विक हिल फाउंडेशनतर्फे श्वेता गणवीर आणि निधी सिंग यांना विशेष मार्गदर्शक म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. या कार्यक्रमात श्वेता गणवीर यांनी सायबर गुन्हे, महिलांवर होणारे ऑनलाइन अत्याचार, प्रेमप्रकरणातून होणारे फसवणुकीचे प्रकार, सोशल मिडियावरील जाळे आणि त्यातून महिलांनी स्वतःची सुरक्षा कशी करावी, याविषयी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.<br>लोकमत : 9/08/2025 | **सायबर सेक्युरीटी जनजागृती -** शारिरीक शिक्षण व राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे **सायबर सेक्युरीटी जनजागृती** कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्या करिता **क्वीक हिल फौंडेशन तर्फे** सायबर वरीअर श्वेता गणवीर तसेच निधी सिंग यांना आमंत्रित करण्यात आले. श्वेता गणवीर यांनी (सोशल मिडिया द्वारा जे गुन्हे होतात)त्यातून महिलांनी आपली सुरक्षा कशी करावी याविषयी मार्गदर्शन केले.केले.विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले. |

| | | |
|---|---|---|
| ३. | **शनिवार दिनांक ०९/०८/२०२५**<br>**वृक्षारोपण** | **वृक्षारोपण -** राष्ट्रीय सेवा योजना विभाग तर्फे महाविद्यालयातील परिसरात |

| | | |
|---|---|---|
| | <br><br><br>यशोदा महाविद्यालयात 'एक पेड माँ के नाम' | वृक्षारोपण करून एक पेड मां के नाम वृक्षोत्सव साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात प्राचार्य डॉ. शरद सांबारे सर यांनी “वृक्ष लागवड -काळाची गरज “ या विषयावर मार्गदर्शन केले. पर्यावरण संतुलनाकारिता वृक्षारोपण करणे गरजेचे आहे. केवळ वृक्ष लावून चालणार नाही तर त्यांचे संगोपन करणे देखील महत्वाचे आहे. प्रत्येकाने आपल्या घरी किंवा आजूबाजूच्या परिसरात किमान एक तरी रोप लावून ते जागवण्याचा प्रयत्न करावा असे मत त्यांनी व्यक्त केले. सर्व प्राध्यापक, व विद्यार्थिनीच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. |
| ४. | **मंगळवार दिनांक १२/०८/२०२५**<br>**आंतर राष्ट्रीय युवा दिन**<br><br><br> | **आंतर राष्ट्रीय युवा दिन-** राष्ट्रीय सेवा योजना व रेड रिबन क्लब यांच्या वतीने दिनांक युवा दिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात अध्यक्ष स्थानी महाविद्यालयातील कार्यकारी प्राचार्य डॉ शरद सांबारे हे होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी युवा दिवसाचे महत्व या विषयाला अनुसरुन युवकांनी आपल्या ध्येंयाप्रती सजग राहून कर्तव्य करून राष्ट्रविकासात हातभार लावण्याचे आवाहन केले. राष्ट्र विकासात युवकांची भूमिका महत्वाची आहे. युवकच सकारात्मक बद्दल घडवून आणून राष्ट्राला प्रगतीपथावर नेवू शकतात. असे त्यांनी संबोधित केले. विशेष मार्गदर्शक प्रा. राजेश घोगरे यांनी स्वामी विवेकानंद यांचा आदर्श घेवून उठा, जागे व्हा आणि ध्येय गाठे पर्यंत थांबू नका असा मौलिक संदेश विद्यार्थीनींना देवून आंतरराष्ट्रीय युवा दिनाच्या शुभेच्छा दिल्या. |

| | | |
|---|---|---|
| ५. | **गुरुवार दिनांक १४/०८/२०२५**<br>**स्वच्छता अभियान**<br><br><br><br> | **स्वच्छता अभियान** - राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे स्वच्छता अभियान कार्यक्रम राबविण्यात आले. या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थिनी द्वारे महाविद्यालयातील परिसर, आजूबाजूचा परिसर स्वच्छ करण्यात आले.कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. शरद सांबारे सरांच्या मार्गदर्शनात करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता राष्ट्रीय सेवा योजना समिती सदस्य डॉ. ललिता पुन्नय्या, डॉ. महेंद्र कटरे, डॉ. सुर्यकांत कापशीकर, डॉ. रश्मी नारनवरे तसेच सर्व प्राध्यापक व विद्यार्थिनीचे सहकार्य लाभले. |
| ६. | **गुरुवार दिनांक १४/०८/२०२५**<br>**"हर घर तिरंगा"**<br><br><br><br> | **"हर घर तिरंगा" -** राष्ट्रीय सेवा योजना विभागा तर्फे **"हर घर तिरंगा"** मार्गदर्शनाचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला. प्राचार्य डॉ. शरद सांबारे सरांनी विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले. झेंड्याचे महत्व पटवून दिले. मार्गदर्शनानंतर लगेच रॅली चे आयोजन करण्यात आले. रॅली ची सुरवात महाविद्यालयातून करण्यात आली. स्नेह नगर परिसरात रॅली काढण्यात आली. व रॅली चे समापन महाविद्यालयात करण्यात आले. रॅलीत विद्यार्थीनिद्वारे देशभक्तीपर नारे म्हणण्यात आले. |

| | | |
|---|---|---|
| ७. | **शुक्रवार दिनांक १५/०८/२०२५**<br>**“स्वातंत्र्य दिन”**<br><br> | **“स्वातंत्र्य दिन”-** महाविद्यालयात “स्वातंत्र्य दिनानिमीत्य ध्वजारोहणचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. संस्थेच्या सन्माननीय अध्यक्षा श्रीमती रत्नमालाताई खापर्डे यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आला. त्यांच्यासोबत प्राचार्य डॉ. शरद सांबारे सर उपस्थित होते. राष्ट्रीय ध्वजाला सलामी देऊन राष्ट्रगीत म्हणण्यात आले. विद्यार्थीनिद्वारे देशभक्तीपर भाषण व गीत प्रस्तुत करण्यात आले. संस्थेच्या सन्माननीय अध्यक्षा श्रीमती रत्नमालाताई खापर्डे यांनी विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले. |
| ८. | **मंगळवार दिनांक १२ ऑगष्ट २०२५**<br>**अँटी रँगिंग दिन**<br><br><br> | **अँटी रँगिंग दिन** उद्घाटनपर कार्यक्रम घेण्यात आला. प्राचार्य डॉ. शरद सांबारे यांनी विद्यार्थीनीना रँगिंग म्हणजे काय? त्या वर उपाय योजना या विषयावर मार्गदर्शन केले. बुधवार दिनांक १३ ऑगष्ट २०२५- विद्यार्थिनी करिता चर्चासत्र आयोजित करण्यात आले. तसेच प्रा. झारिना सलीम लघुपट दाखवण्यात आले. सोमवार दिनांक १८/०८/२०२५ - घोषवाक्य व पोस्टर प्रदर्शन आयोजित करण्यात आले. श्रीमती मीरा कडबे समन्वयक ओलावा फौंडेशन नागपूर, यांनी पोस्टर प्रदर्शन चे उद्घाटन केले. . त्यांनी विद्यार्थिनीना मार्गदर्शन केले. |

| | | |
|---|---|---|
| ९. | **बुधवार दिनांक २०/०८/२०२५**<br>**राजीव गांधी जयंती**<br><br> | **राजीव गांधी जयंती -**<br>महाविद्यालयात राजीव गांधी जयंती कार्यक्रम घेण्यात आला. या प्रसंगी महाविध्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद सांबारे सर यांच्या हस्ते राजीव गांधी यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करण्यात आले. त्यांनी विध्याथिनीना मार्गदर्शन केले. राजीव गांधी यांचे आदर्श समोर ठेऊन आपल्या जीवनात वर्तन करावे असे मत त्यांनी व्यक्त केले. प्राध्यापक राजेश घोगरे यांनी राजीव गांधी यांचे जीवन चरित्र सांगितले. |
| १०. | **सोमवार दिनांक ०८/०९/२०२५**<br>**आंतर राष्ट्रीय साक्षरता दिन**<br><br><br><br> | **आंतर राष्ट्रीय साक्षरता दिन**<br>महविद्यालयात रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभाग व महिला अध्ययन तर्फे आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन कार्यक्रम करण्यात आले. प्रा. डॉ गोविंद रावलेकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. ललिता पुन्नय्या यांनी विध्यार्थीनिना साक्षरतेचे महत्व सांगितले. विध्यार्थीनिनि तंत्रज्ञान अवगत करावे. स्वताला सक्षम व आत्मनिर्भर करावे. तसेच नैतिक मुल्ये जपावे. विद्यार्थिनी, एक मुलगी म्हणून आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवावी असे मत त्यांनी व्यक्त केले. |

| | | |
|---|---|---|
| ११. | **मंगळवार दिनांक १६/०९/२०२४**<br>**ओझोन डे** | राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फ ओझोन दिनानिमित्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कर्यक्रमात |

| | | |
|---|---|---|
| | <br><br><br> | प्राचार्य डॉ. शरद सांबारे सरांनी "ओझोन डे" या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच डॉ. ललिता पुन्नय्या यांनी ओझोन लेअर सुरक्षा कवच म्हणून कसे कार्य करते, ते कमी झाल्याने आरोग्यावर व पर्यावानावर त्याचा विपरीत परिणाम कसा होतो याची माहिती दिली. ओझोन लेअर सुरक्षित ठेवण्याकरिता पर्यावरण संतुलन आवश्यक आहे. त्याकरिता जास्तीत जास्त वृक्ष लावणे व त्याचे संगोपन करणे गरजेचे आहे. असे मत त्यांनी व्यक्त केले. विद्यार्थिनीद्वारे स्नेह नगर परिसरात रॅली काढण्यात आली. |
| १२. | **बुधवार दिनांक १७/०९/२०२४**<br>**रस्ता सुरक्षा अभियान**<br><br><br> | **रस्ता सुरक्षा अभियान** - राष्ट्रीय सेवा योजना व जन आक्रोश संस्था, नागपूर यांच्या संयुक्त विध्यमाने **"सडक** सुरक्षा जागरुकता आणि अपघात मुक्त परिसर अभियान" कार्यक्रम अंतर्गत जन आक्रोश संस्था, नागपूर चे पदाधिकारी यांना आमंत्रित करण्यात आले. त्यांनी विद्यार्थीनीना सडक सुरक्षा व अपघात कसे टाळता येईल याविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थीनीना त्यांच्या हातात वाहतूक नियंत्रणाचे फलक देऊन, छोटे छोटे नियम कसे पाळायला पाहिजे हे सांगून त्यांना वाहतूक नियंत्रण करण्यास सांगितले. |

<table>
<tr>
<td>१३.</td>
<td>

**सोमवार दिनांक २२/०९/२०२५ ते सोमवार दिनांक २९/०९/२०२५ - राष्ट्रीय सेवा योजना दिवस सप्ताह**

<u>**सोमवार दिनांक २२/०९/२०२५**</u>

<u>**सोमवार दिनांक २२/०९/२०२५ : विद्यार्थी प्रिय शिक्षकाचा सत्कार**</u>







</td>
<td>

<u>**सोमवार दिनांक २२/०९/२०२५ : विद्यार्थी प्रिय शिक्षकाचा सत्कार**</u> **-** महाविद्यालयात विद्यार्थिनी कडून त्यांच्या आवडीच्या प्रध्यापकाबाबत, त्यांच्या व्यक्तिमत्वाबद्दल लिहून बंद डब्यात टाकण्यास सांगितले. प्राचार्य डॉ. शरद सांबारे व इतर सदस्यांच्या समक्ष डबा उघडून विद्यार्थीप्रिय प्राध्यापकाची निवड करण्यात आली. प्राचार्य डॉ. शरद सांबारे यांनी डॉ. राधाकृष्णन यांच्या शिक्षण क्षेत्रातील योगदानाबद्दल माहिती दिली. शिक्षणाचे महत्व सांगितले. उच्च शिक्षण घेऊन आत्मनिर्भर व सक्षम व्हा असे मत त्यांनी व्यक्त केले. या प्रसंगी विद्यार्थीप्रिय प्राध्यापक डॉ. के.जी. मेश्राम यांचा सत्कार करण्यात आला.

</td>
</tr>
<tr>
<td>१४.</td>
<td>

<u>**मंगळवार दिनांक २३/०९/२०२५ भारतरत्न सरदार वल्लभ भाई पटेल यांचे कार्य**</u>







</td>
<td>

<u>**भारतरत्न सरदार वल्लभ भाई पटेल यांचे कार्य -**</u> महाविद्यालयातील विद्यार्थीनीनमध्ये राष्ट्रीय एकात्मतेची भावना निर्माण व्हावी या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रा. राजेश घोगरे यांनी विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले. सरदार पटेल हे एक महत्वपूर्ण राजकारणी होते. स्वातंत्र्य लढ्यातील त्यांची कामगिरी, भारताची अखंडता कायम धेवण्याच्या दृष्टीकोनातून केलेले कार्य, त्यांचे कणखर नेतृत्व याची संपूर्ण माहिती दिली.

</td>
</tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| १५. | **<u>बुधवार दिनांक २४/०९/२०२५ राष्ट्रीय सेवा योजना दिन (स्वच्छता अभियान)</u>**<br><br><br><br> | **<u>राष्ट्रीय सेवा योजना दिन (स्वच्छता अभियान) -</u>** महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्य कर्यक्रम घेण्यात आले. प्रा. महेंद्र कटरे यांनी विद्यार्थीनीना राष्ट्रीय सेवा योजना दिनाचे महत्व सांगितले. राष्ट्रीय सेवा योजना दिनाचे औचित्य साधून महाविद्यालय परिसर तसेच स्नेह नगर परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या कार्यक्रमात सर्व प्राध्यापक व विद्यार्थीनिनी सहभाग घेतला. |
| १६. | **<u>गुरुवार दिनांक २५/०९/२०२५ पंडित दीनदयाल जयंती - अंत्योदय दिवस -</u>**<br><br><br><br> | **<u>पंडित दीनदयाल जयंती - अंत्योदय दिवस -</u>** प्रा. डॉ. महेंद्र कटरे यांनी विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले. पंडित दीनदयाल हे भारताचे महान राष्ट्रभक्त, तत्वज्ञ, राजकारणी , विचारवंत व संघटक होते. त्यांनी संघाचे विचार आणि संस्कार जीवनात आत्मसात केले. आपल्या विचाराच्या मादयमातून समाजात राष्ट्रीयत्वाची भावना जागृत केली. आपल्या राजकीय कारकिर्दीत एकात्म मानवतावाद हि नवीन राजकीय व सामाजिक विचारधारा मांडली. त्यांच्या नावाने अंत्योदय दिवस पाळला जातो. अंतापासून उदय, समाजातील सर्वात गरीब, दुर्बल किंवा मागासलेल्या लोकांची उन्नती व कल्याण याबाबत त्यांनी केलेले कार्य याची सपूर्ण माहिती सांगितली. |

| | | |
|---|---|---|
| १७. | **<u>शुक्रवार दिनांक २६/०९/२०२५ जागतिक पर्यावरण आरोग्य दिवस</u>** | **<u>जागतिक पर्यावरण आरोग्य दिवस -</u>** महाविद्यालयीन |

| | | |
|---|---|---|
| | <br> | विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण व त्याची मानवी जीवनातील महत्व याबाबत जनजागृती व्हावी या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रा. डॉ. ललिता पुन्नय्या यांनी करण्यात विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. शरद सांबारे यांनी मार्गदर्शन केले. पर्यावरणाचं रक्षण करणं ही केवळ जबाबदारी नाही तर ते आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे असे सांगितले. |
| १८. | **<u>शनिवार दिनांक २७/०९/२०२५ : विश्व पर्यटन दिवस -</u>**<br><br> | **<u>विश्व पर्यटन दिवस -</u>** छत्रपती शिवाजी महाराजाच्या १२ गड्कील्ल्याचा UNESCO च्या यादीमध्ये समावेश करण्यात आल्यामुळे महाराजांच्या कार्याबद्दल व त्यांनी निर्माण केलेल्या हिंदवी स्वराज्याच्या प्रेरणादायी इतिहास विद्यार्थ्यांना कळावा याकरिता विश्व पर्यटन दिवसा निमित्य छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य या विषयावर मार्गदर्शनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. प्रा. डॉ. सुर्यकांत कापशीकर यांना आमंत्रित करण्यात आले. त्यांनी विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन अ[पल्या जीवनात यश प्राप्त करावे असे मत त्यांनी व्यक्त केले. |

| | | |
|---|---|---|
| १९. | **<u>रविवार दिनांक २८/०९/२०२५ : शहीद भगतसिंग जयंती</u>**<br><br> | **<u>शहीद भगतसिंग जयंती -</u>** भगत सिंग यांच्या कार्याची विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण व्हावी या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रा. डॉ. सुर्यकांत कापशीकर यांना आमंत्रित करण्यात आले. त्यांनी भगतसिंग यांचे संपूर्ण जीवन चरित्र सांगितले. भगतसिंग यांनी देशप्रेमाकरिता आपल्या जीवनाचे बलिदान दिले. त्या महान व्यक्तीला स्मरण करावे व आपल्यातही राष्ट्रप्रेम व देशप्रेम जागृत ठेवावे असे आव्हान त्यांनी केले. |
| २०. | **<u>सोमवार दिनांक २९/०९/२०२५ : जागतिक हृदय दिवस -</u>**<br><br> | **<u>जागतिक हृदय दिवस -</u>** हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी रोगांबद्दल (CVDs) जागरूकता वाढवण्यासाठी आणि हृदयाच्या आरोग्याला प्रोत्साहन देण्यासाठी हृदयरोगांबद्दल जनजागृती करतो, या दिवशी हृदयविकारांपासून बचाव करण्यासाठी आणि निरोगी हृदयासाठी सक्रिय उपाययोजना करण्यासाठी लोकांना प्रेरित केले जाते. या उद्देशाने महाविद्यालयात पोषण व आहार या विषयावर मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्या करिता प्रा. अनुराधा नवघरे, प्रा. शुभांगी भोयर यांना आमंत्रित करण्यात आले. त्यांनी आहार या विषयावर मार्गदर्शन केले. |

<table>
<tr>
<td>२१.</td>
<td>बुधवार दिनांक १९/११/२०२५ : ऑपरेशन थंडर कार्यक्रम -<br>
<br>
</td>
<td>ऑपरेशन थंडर कार्यक्रम - पोलीस विभाग नागपूर, राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने व्यसनमुक्ती संबंधी ऑपरेशन थंडर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी नागपूर डेपुटी पोलीस कमिशनर श्री निकेतन कदम, रातुम नागपूर विद्यापीठाचे कुलगुर डॉ. माधवी खोडे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, राष्ट्रीय सेवा योजना विभाग संचालक डॉ. सोपानदेव पिसे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. विकास खंडाल यांनी विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील ०५ विद्यार्थीनिनी सहभाग घेतला.</td>
</tr>
<tr>
<td>२२.</td>
<td>बुधवार दिनांक २६/११/२०२५ संविधान दिन<br><br><br>
</td>
<td>संविधान दिन - राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वतीने संविधान दिंडीचे आयोजन करण्यात आले. डॉ. आंबेडकर लॉ कॉलेज विद्यापीठ परिसर संविधान पार्क, येथे सर्वप्रथम कुलगुरू डॉ. माधवी खोडे व इतर मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास माल्यार्पण करण्यात आले. नंतर कुलगुरू डॉ. माधवी खोडे यांच्यासह भारतीय संविधान प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन करण्यात आले. व संविधान दिंडीला सुरवात करण्यात आली. व समाप्ती संविधान चौक, येथे करण्यात आले. या कर्यक्रमात महाविद्यालयातील १० विद्यार्थीनिनी सहभाग घेतला.</td>
</tr>
</table>

<table>
<tr>
<td>२३.</td>
<td>बुधवार दिनांक २६/११/२०२५ संविधान दिन<br><br></td>
<td>संविधान दिन -संविधान दिनानिमित्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. के.जी. मेश्राम उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करण्यात आले. संविधानाचा अभ्यास केल्याशिवाय आपला सर्वांगीण विकास होणार नाही प्रत्येक विद्यार्थ्यांनी भारतीय संविधान अंगीकृत करून त्याचे पालन करायला पाहिजे असे आव्हान डॉ. के.जी. मेश्राम सरांनी केले. या प्रसंगी डॉ. रश्मी नारनवरे यांच्यासह भारतीय संविधान प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन करण्यात आले.</td>
</tr>
<tr>
<td>२४.</td>
<td>शनिवार दिनांक २८/११/२०२५ : नागपूर बुक फेस्टिवलला शैक्षणिक भेट<br><br><br><br></td>
<td>नागपूर बुक फेस्टिवलला शैक्षणिक भेट - महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाने नागपूर महानगरातील रेशीमबाग मैदानावर आयोजित नागपूर बुक फेस्टिवलला शैक्षणिक भेट देत पुस्तक, साहित्य आणि ज्ञानाच्या दुनियेशी प्रत्यक्ष संवाद साधला. भारतातील प्रमुख प्रकाशन संस्थांनी मांडलेल्या विविध विषयांवरील पुस्तकांच्या विशाल दालनामुळे विद्यार्थ्यांना वाचन, साहित्यिक चळवळ आणि पुस्तक संस्कृतीचे समृद्ध दर्शन घडले. या शैक्षणिक भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी विविध बुक स्टॉलला भेट दिली.</td>
</tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| २५. | **मंगळवार दिनांक ०२/११/२०२५ : जागतिक एड्स दिन**<br><br><br><br><br><br>**Yashoda Girls' Arts and Commerce College**<br>health checkups and the role of youth in fighting stigma and discrimination against people living with HIV.<br>Dr Sangeeta Ghogre also shared insights with using PPT and video which made the programme more engaging and informative. The Red ribbon club and National Services Scheme (NSS) in-charge Dr Lalita Punnya gave the message of compassion and responsible behaviour. The event concluded with a vote of thanks by Dr Rashmi Namawrane. Principal Dr Sharad Sambare, Dr Lalita Punnya, Prof. Rajesh Ghogre, Dr Pawlekar, Dr Katre, Dr Kapshikar, Dr Sudhakar Thool, Dr Amol Baute, Dr Rasmi Namaware, Zarina Salim and a large number of students were present. | **जागतिक एड्स दिन -** महविद्यालयात जागतिक एड्स जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाला एन.एम.सी. हॉस्पिटल, पांडे ले आउट नागपूर येथील एड्स आयसीटी समन्वयक निकिता बुलबुले मॅडम मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी एचआयव्ही व एड्स याविषयी माहिती दिली. समज व गैरसमज याविषयी सांगितले. डॉ. संगीता घोगरे मॅडम यांनी PPT द्वारे एचआयव्ही व एड्स म्हणजे काय? त्याची कारणे, शरीरावर होणारे दुसपरीणाम, उपाय योजना याची सर्व माहिती दिली. |
| २६. | **मतदान जनजागृती गुरुवार ०८/०१/२०२६ ते सोमवार १२/०१/२०२६**<br><br><br><br><br><br> | **मतदान जनजागृती -** विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. **मतदान रॅली व घोषवाक्य –**विद्यार्थिनीद्वारे स्नेह नगर व खामला परिसरात रॅली काढण्यात आली. रॅलीत मतदान जनजागृती वर आधारित घोषवाक्य म्हणण्यात आले.<br>**मतदान जनजागृती मार्गदर्शन** -प्रा. प्रीती खोब्रागडे मॅडम यांनी विद्यार्थीनीना मतदानाचे महत्व, मतदानाचा अधिकार याविषयी माहिती दिली. या प्रसंगी डॉ. महेंद्र कटरे यांनी विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले.<br>**मतदान जनजागृती प्रतिज्ञा –-मतदान जागृती बद्दल** सामूहिकरीत्या प्रतिज्ञा घेण्यात आली.<br>**मतदान जनजागृती पथनाट्य** विद्यार्थिनीद्वारे स्नेह नगर परिसरात मतदान जनजागृती **पथनाट्य सादर** करण्यात आले. |

| | | |
|---|---|---|
| २७. | **सोमवार दिनांक 12 जानेवारी 2026**<br>**राष्ट्रीय युवा दिन**<br> | **राष्ट्रीय युवा दिन** -<br>महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व रेड रिबन क्लब द्वारे राष्ट्रीय युवा दिन कार्यक्रम घेण्यात आला. यात स्वामी विवेकानंद यांचे विचार आणि युवक या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. यात विद्यार्थी<br>आणि प्राध्यापक वर्ग उपस्थितीत होते. |
| 28. | **राष्ट्रीय सेवा योजना शिबीर**<br>**रविवार दिनांक १८/०१/२०२६ ते**<br>**शनिवार दिनांक २४/०१/२०२६**<br> | **शिबिराचे उद्घाटन**<br>महाविद्यालयातर्फे राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीराचे आयोजन समाज भवन पुनर्वसन खापरी येथे आयोजित करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन सोमवार दिनांक २० जानेवारी २०२६ रोजी श्री प्रा. श्रीकांत घोगरे महाविद्यालय विकास समिती सदस्य नागपूर यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी संस्थेच्या सन्माननीय अध्यक्षा श्रीमती रत्नमालाताई खापर्डे, श्री मनीष खापर्डे, प्राचार्य डॉ. शरद सांबारे, डॉ. के.जी. मेश्राम तसेच सर्व प्राध्यापक उपस्थित होते.<br>**शिबिराचा समारोप** : शनिवार दिनांक २४ जानेवारी २०२६ रोजी करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य, उपसरपंच व सर्व प्राध्यापक उपस्थित होते. |

<table>
<tr>
<td></td>
<td>
व्यायाम, सूर्यनमस्कार<br>

<br>
योग व प्राणायाम<br>

<br>
ग्रामसफाई<br>

<br>

<br>

<br>


</td>
<td>शिबिरात रोज सकाळी शिबिरार्थींना व्यायाम, सूर्यनमस्कार, व आसनाचे प्रशिक्षण देण्यात आले. श्रमदान अंतर्गत शिबीर परिसर, बौद्ध विहार, मंदिर, व ग्रामसफाई करण्यात आले. लोकांना श्रमदानाचे, स्वच्छतेचे व आरोग्यविषयी माहिती सांगण्यात आले</td>
</tr>
</table>

<table>
<tr>
<td></td>
<td>

**स्वच्छता अभियान - बौद्ध विहार परिसर**







**स्वच्छता अभियान हनुमान मंदिर**







**स्वच्छता अभियान जग्गनाथ मंदिर**







</td>
<td>श्रमदान अंतर्गत, बौद्ध विहार, हनुमान मंदिर, जग्गनाथ मंदिर परिसर  स्वच्छ करण्यात स्ले.</td>
</tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | **सायबर क्राईम**<br><br><br>**LPG गॅस बचत व गॅस सुरक्षा**<br><br><br>**बालाजी मंदिर ला भेट**<br><br><br>**आत्मरक्षण कार्यशाळा**<br><br><br>**नि:शुल्क रोगनिदान शिबीर**<br><br> | रोज शिबिरार्थी व गावातील लोकांना वेगवेगळ्या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. |
| | **ग्रामगीता भजन**<br><br> | रोज शिबिरार्थी व गावातील लोकांना वेगवेगळ्या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. |

**डीजीटल लिटरसी मार्गदर्शन**




**अवयव दान जन जागृती**




**रस्ता सुरक्षा अभियान**




**राष्ट्रीय मतदार दिन / मतदान जनजागृती रॅली**

